Shanti Education Society's
A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
ALL PROGRAMS NBA ACCREDITED
ISO 9001:2008 CERTIFIED (LMS-DAC) DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18 (2/2A) / 2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413 008 (Maharashtra)
Ph.No. -0217-2341899, Email : contact@agppi.edu.in Web : www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2020-21/~~131~~ 77

Date: 29.01.2021

# सुचना

## "हुतात्मा दिन साजराकरणेबाबत"

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्मांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दरवर्षी ३० जानेवारी रोजी संपूर्ण देशभर २ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन परिपत्रक जपुती २२२० / प्र.क्र ५ / २९, दि. २७.०१.२०२० व जपुती २२२१ / प्र.क्र. १ / २९, दि. २८.०१.२०२१ नुसार या ही वर्षी उदईक शनिवार, दि. ३०.०१.२०२१ रोजी स. ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस **"हुतात्मा दिन"** म्हणून पाळावयाचे असल्याने शनिवार, दि. ३०.०१.२०२१ रोजी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यंत इशारा भोंगा (बेल) वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इ. सर्वांनी आहे त्या ठिकाणी उभे राहून दोन मिनिटे (स्तब्धता) पाळावे, ठिक ११.०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा ११.०३ मिनिटांपर्यंत वाजविण्यात येईल. हुतात्म्यांना आदरांजली गंभिरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलि. इन्स्टिट्युट,
सोलापूर

**टिप : सर्व विभाग प्रमुख व प्रथम वर्ष इनचार्ज यांनी वरील नमुद शासन परिपत्रकातील निर्देशानुसार आपापल्या विभागवार बेल व इतर गोष्टींचे नियोजन करून घ्यावे. तसेच सर्व स्टाफनां अवगत करावे.**

प्रत :
1) CE 2) CO 3) EE 4) EJ
5) ME 6) FY 7) Library 9) Web Portal
9) Admin.

दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन ( स्तब्धता ) पाळून हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती२२२१/प्र.क्र.९/२९**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ जानेवारी, २०२१

वाचा :- केंद्र शासनाच्या गृह विभागाच्या क्र.२/१/२०२१-Public, दिनांक १८ .०१.२०२१ चे पत्र.

प रि प त्र क

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शनिवार, दिनांक ३० जानेवारी,२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. शनिवार, दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन ( स्तब्धता ) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१२८१६५११५८१२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALIT NAMDEO SADAFULE

(ल. ना. सदाफुले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

To o.s. फिर न.घ 29.1.21

प्रति,
१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई

A.G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE, SOLAPUR
Inward No :- 372
Date :- 29/1/2021
Forward to :- OS.